NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE
नागपूर शहर पोलीस आयुक्तालय
(पोलीस वार्तापत्र)

दुपार

दिनांक 12.01.2019 शनिवार

(मिसीग)

1) हरविलेल्या इसमांचा शोध होणेबाबत :

आचल दशरथ माकडे, वय 19 वर्ष, रा. गोपाल कृष्ण नगर, प्लॉट नं. 171, शितलामाता मंदीर जवळ, पो.स्टे. नंदनवन ही दिनांक 07.01.2019 चे 1015 वा चे सुमारास राहते घरून कोणाला काही न सांगता निघुन गेली. बेपत्ता आहे. शोध घेतला असता मिळुन आली नाही. वर्णन – रंग गोरा, चेहरा गोल, बांधा साधारण असुन तिने अंगात सलवार कुर्ता घातलेला असून ती मराठी भाषा बोलते.



आचल

वरील छाया चित्रावरून ओळखणा–यांनी संबंधीत पोस्टेला संपर्क साधावा.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर

## प्रेसनोट

दिनांक 16.01.2019 रोजी नागपूर येथील झिरो मॉईल चौक येथे स्वर्गीय जतीराम बर्वे यांचा स्मृतिदिन कार्यक्रम होणार असून, या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून भोई, ढिवर, कहार इत्यादी मच्छिमार समाजाचे बांधव व नेते मंडळी तसेच प्रतिष्ठीत गण उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रम सुरळीत पार पाडावा तसेच वाहतूक सुरळीत राहावी, नागरीकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा होवू नये म्हणून जा.क्र. 176/2019 अन्वये दिनांक 11.01.2019 रोजी खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित केली आहे

1. फॉरेस्ट ऑफीस चौक ते झिरो माईल चौका पर्यंत (स्थानिक रहिवासी वगळून) सायकल व सायकल रिक्षासह सर्व प्रकारच्या वाहनांसाठी येण्या जाण्या करीता पुर्णपणे बंद राहील.

या मार्गावरील वाहतूक खालील प्रमाणे नमुद मार्गाने वळविण्यात येत आहे.

(अ) झिरो मॉईल चौकाकडून फॉरेस्ट ऑफीस कडे येणार झिरो मॉईल पासून पुढे संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाचे जवळून डावे वळण घेवून ते फॉरेस्ट ऑफीस चौकाकडे वळविण्यात येईल.

(ब) फॉरेस्ट ऑफीस चौक ते झिरोमॉईल चौक कडे जाणारी वाहतूक ही फॉरेस्ट ऑफीस चौकातून डावे वळण घेवून संविधान चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयापासून मार्ग वळविण्यात येईल.

**ही अधिसुचना दि. 16.1.2019 चे सकाळी 07.00 वा. ते कार्यक्रम संपे पर्यंत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या आव्हानाचे पालन करून, आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

## प्रेसनोट

लिबर्टी सिनेमा चौक ते मेश्राम पुतळा ते दुर्गा माता मंदिर छावणी चौक डावी बाजुचे सिमेंट रोडचे काम अर्जदार श्री. कार्तीक चंद्रा दास,प्रोजेक्ट मॅनेजर,रा.निरवाना कंट्रीयार्ड, गुरूग्राम,हरीयाणा , केसीसी बिल्डकॉन प्रा. लि. हरीयाणा या कंपनीव्दारे 90 दिवसात टप्पा टप्पाने पहिला टप्पा :— लिबर्टी सिनेमा चौक ते सदर कॅफे हाऊस चौक, दुसरा टप्पा :— सदर कॅफे हाऊस चौक ते मंगलदिप चौक आणि तिसरा टप्पा :— मंगलदिप चौक ते मेश्राम पुतळा चौक अशा तीन टप्प्यात नमुद मार्गावर सिमेंट रोडचे काम पुर्ण करण्यात येणार आहे. सदरच्या रस्त्यावर दिवसभर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन दिनांक 11/01/2019 अन्वये खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित केली आहे.

**लिबर्टी सिनेमा चौक ते मेश्राम पुतळा चौक या दरम्यान सिंमेट रोड काम सुरू असतांना सर्व प्रकारचे वाहनाकरीता प्रवेशास मनाई करण्यात येवुन नमुद मार्गावरील वाहतुक वळविण्यात येणारे मार्ग खालील प्रमाणे**

—: कळमेश्वर — काटोल, सावनेर कडे जाणारी वाहतुक ही लिबर्टी चौक येथुन डावे वळन घेवुन व्हीसीए चौक मार्गे सदर पो. स्टे. समोरून जपानी गार्डन चौक मार्गे जुना काटोल नाका चौक व आवश्यकतेप्रमाणे पुढे जातील.

**सदर अधिसुचना दि. 12.01.2019 रोजी पासून 11.02.2019 पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

## प्रेसनोट

उदयनगर चौक ते म्हाळगीनगर चौक दरम्यान मार्गाचे उजव्या बाजुचे सिमेन्टीकरणाचे काम आर.पी.एस. इन्फ्रा प्रोजेक्टस् प्रा. लि. या कंपनीव्दारे 03 महिण्याचे आत पुर्ण करण्यात येणार आहे. सदर रोडचे काम सुरू झाल्यावर तेथील वाहतूक व्यवस्था सुरळित व सुरक्षित राहावी. याकरीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये यादृष्टीने उदयनगर चौक ते म्हाळगीनगर चौक (उजवी बाजु) या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन दिनांक 11/01/2019 अन्वये खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित केली आहे.

**उदयनगर चौक ते म्हाळगीनगर चौक पर्यंतचे (उजवी बाजु) लेनवर काम सुरू असतांना या मार्गावरील सर्व प्रकारचे वाहतूकीस बंदी घालण्यात येत आहे.**

नमुद मार्गावरील वाहतुक उदयनगर चौक ते म्हाळगीनगर चौक दरम्यान असलेल्या रोड दुभाजकाचे डाव्या बाजुने दुतर्फा जाईल. व उदयनगर चौकातुन व म्हाळगीनगर चौकातुन पुर्ववत रस्त्याचे दोन्ही भागातुन जाईल.

**सदर अधिसुचना दि.11.01.2019 ते 10 .02.2019 पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.